बैठकीचे इतिवृत्त

दिनांक /१२/२०२३

दिनांक १४/१२/२०२३ रोजी ११.०० वाजता शासन परिपत्रक क्र डीपीपी २०१५ /प्रक्र /५०/पोल १० दिनांक १७/१०/२०१५ नुसार पोलीस उप आयुक्त ( प्रकटीकरण ) गुन्हे शाखा.गु.अ.वि. मुंबई यांच्या अध्यक्षते खाली गठीत समितीची नियोजीत बैठक अध्यक्षांच्या दालनात पार पडली.

सदर बैठकीस खालील सदस्य हजर होते.

१) श्री.मिलिंद काटे, पोलीस निरीक्षक, गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक, मुंबई........... सदस्य
२) सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता, मुंबई................................ सदस्य

शासन परिपत्रक क्र २०१५/प्र.क्र ५१/पोल १० दिनांक १७/१०/२०१५ मधील शासनाच्या सुचने प्रमाणे न्यायालयीन प्रकरणाचा निकाल तपासी यंत्रणा अथवा अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्या विरुध्द गेला असल्यास त्या संदर्भात दिनांक १४/१२/२०२३ रोजी १२.४० वा. खालील गुन्हयातील आरोपी निर्दोष सुटल्याने बैठक आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये माहे जुलै २०२३ ते सप्टेंबर २०२३ या कालावधीतील आरोपी निर्दोष सुटलेल्या गुन्हयाचा आढावा घेण्यात आला.

सदर बाबत कक्ष १ ते ५, मालमत्ता कक्ष, खंडणी विरोधी पथक व गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक या कक्षांचा माहे जुलै २०२३ ते सप्टेंबर २०२३ या कालावधीतील अहवाल मागविण्यात आले होते. प्राप्त अहवाला मधील १) कक्ष - १,२, मालमत्ता कक्षच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा करण्यात आली. शासन परिपत्रकातील प्रपत्राप्रमाणे अहवाल सोबत जोडण्यात आला आहे.

सदर चर्चा करुन . वाजता बैठक संपविण्यात आली.

(पुजा ढोके)
विधी अधिकारी,
गुन्हे शाखा, मुंबई

( मिलिंद काटे)
पोलीस निरीक्षक,
गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक,
गुन्हे शाखा. मुंबई

( राज तिलक रौशन )
पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१),
अति. कार्यभार पो.उ.आ. (प्रकटीकरण)
गुन्हे शाखा, मुंबई

Scanned with CamScanner

( शासन परिपत्रक ,गृह विभाग, क्र डीपीपी–२०१५ /प्र.क्र ५१/पोल १०, दिनांक २६ फेब्रुवारी २०१९ सोबतचे प्रपत्र )

आयुक्तालय / पोलीस अधिक्षक कार्यालय :– पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) गुन्हे शाखा, मुंबई

समितीच्या बैठकीचा दिनांक :– 18 /12/२०२३

## माहे जुलै –२०२३ ते सप्टेंबर २०२३ पर्यंतचा अहवाल

| अ. क्र. | | प्रकरण कमांक/ मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरुप (गुन्हा नोंद कमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक व न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णया नुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांचे नांव, त्यांच्याविरुध्द केलेली/प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | खंडणी विरोधी पथक | MCOC स्पेशल केस क्र १२/२०१६ | गु.प्र.शा. .गु.अ. वि. .गु.र.क्र. ३९/२०१६, कलम ११५, सह ३०२, १२०(ब), ३४ भादवि सह ३,२५ आर्म ॲक्ट सह ३७(१) (अ) मपोका सह ३(१) (ii), ३ (२), ३(४) मोक्का कायदा (अंबोली पो. ठाणे गु.र.क्र. १५३/२०१६ ) | दाखल दि. ०२/०९/२०१६<br><br>न्यायनिर्णय दि. १८/०८/२०२३ | १) फौ.दं.प्र.स.कलम १०० (७) अन्वये जप्ती पंचनाम्याच्या प्रती आणि जप्त केलेल्या वस्तूंची यादी आरोपींना देण्यात आली नाही.<br>२) पंच साक्षीदार यांच्या साक्षी परस्पर विरोधी आहेत.<br>३) आरोपी क्र १ ते ३ यांचेकडून जप्त केलेला मुद्देमाल व जप्ती पंचनाम्यातील पंचानी साक्षीदरम्यान जप्त मददेमालाबाबत केलेले कथन यामध्ये तफावत आहे. पंच साक्षीदार फितुर<br>४) फिर्यादी यांनी आरोपीच्या घरामधून हस्तगत केलेले दस्ताऐवज आरोपीच्या घरामधून जप्त केल्याचे सिध्द करु शकले नाही.<br>५) आरोपींचा गुन्हयाच्या अनुषंगाने परस्पर संबंध सिध्द झाले नाही.<br>६) तपास अधिकारी यांनी आरोपी क्रमांक ४ चा गुन्हयामधील सहभागाच्या अनुषंगाने इतर आरोपींबरोबर ओळख परेड घेतलेली नाही.<br>७)आरोपींमधिल पूर्व संवाद, भेटी यांबाबत सीसीटीव्ही, सीडीआर यांसारखे पुरावे गोळा करण्यात तपासी अधिकारी अयशस्वी.<br>८) आरोपी क्र. ३ व साक्षीदार क्र.१२ यांचे व्यवहारामध्ये झुलफीकार यांची मध्यस्तीबाबत साक्षीदार क्र.७ कडील कथीत कराराबाबतचे पुरावे समर्थनीय नाहीत. | निरंक | निरंक | निरंक |

( पुजा ढोक )
विधी अधिकारी
गुन्हे शाखा, मुंबई.

( मिलिंद काठे )
पोलीस निरीक्षक,
गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक,
गुन्हे शाखा, मुंबई.

( राज तिलक रौशन)
पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१),
अति. कार्यभार पो.उ.आ. (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, मुंबई.

Scanned with CamScanner

| | | …न्यायालयाचे ठिकाण | (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | …न्यायालयात सादर केल्याचा दिनांक व न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णया नुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्याचे नांव, त्याच्याविरुध्द केलेली/प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ९) तपासी अधिकारी यांनी पडताळणीकरीता आवाजाचे नमुने एफ एस एल ला पाठविलेले नाहीत.<br>१०) जिवे मारण्याची धमकी दिलेबाबत फोन कॉल्सच्या 'भाषांतरावरून' काही उघड होत नाही.<br>११) कलम ६५ ब(४) भा.पु.का. बाबत साक्षीदार क्र. १२ कडून पूर्तता करण्यात आलेली नसून ६५ ब (२) मध्ये तांत्रिक त्रुटी आढळून आलेल्या आहेत.<br>१२) पंच साक्षीदार फितुर झाल्यामुळे आरोपीतांच्या फोनमधून प्राप्त पुरावे सिध्द झाले नाहीत.<br>१३) अटक व पाहीजे आरोपीतांनी व्हॉट्सअॅप व फोन कॉल केल्याचे फिर्यादी पक्ष सिध्द करु शकले नाहीत.<br>१४) पाहीजे आरोपीबाबत दोन गुन्हयांचा संदर्भ देण्यात आलेला नाही तसेच आरोपी विरुध्द आवाजाच्या नमुन्याचा कोणताही संदर्भ नव्हाता. | | | |
| २ | खंडणी विरोधी पथक | कोर्ट केस क्र.<br>MCOC०९/२०१६ | गु.प्र.शा. .गु.अ. वि. .गु.र.क्र. १९/२०१६, कलम ३०७, ४५२,१२०(ब), २०१, ३४ भादवि ३,२५,२७ भाहका सह मोक्का का. (चुनाभट्टी पो. ठाणे गु.र.क्र. ४५/२०१६ ) | दाखल दि.<br>१९/०५/२०१६<br>न्यायनिर्णय दि.<br>२६/०९/२०२३ | १) प्रत्यक्षदर्शी साक्षिदार आरोपीतांचे चेहरे झाकलेले असल्यामुळे त्यांना ओळखण्यात अयशस्वी झाले.<br>२) पिडीत क्र . ७ यांना झालेल्या जखमा बुलेटमुळे झाल्या आहेत की नाही याबाबत १००%खात्री नसलेबाबत वैदयकीय अधिकारी, सायन हॉस्पीटल यांना साक्ष दिली.<br>३) पिडीत क्र. ७ वर झालेल्या हल्यासाठी आरोपी क्र .१ ते ८ हे जबाबदार असलेबाबतचा पुरावा पुरेसा नाही.<br>४) पिडीत क्र. ७ च्या सख्या भावाने सादर केलेल्या पुराव्यामध्ये विसंगती आढळून आली. | निरंक | निरंक | निरंक |

( पुजा ढोक)
विधी अधिकारी
गुन्हे शाखा, मुंबई.

१८/१२/२०२३
( मिलिंद काठे )
पोलीस निरीक्षक,
गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक,
गुन्हे शाखा, मुंबई.

( राज तिलक रौशन)
पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१),
अति. कार्यभार पो.उ.आ. (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, मुंबई.

Scanned with CamScanner

| | प्रकरण कमांक/ मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरुप (गुन्हा नोंद कमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक व न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णया नुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्याचे नांव, त्यांच्याविरुद्द केलेली/प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ५) अरिहंत ग्रुप ऑफ कंपनीच्या कार्यालयामध्ये गोळीबाराच्या घटनेमध्ये सर्व आरोपींमधिल संबंध प्रस्तापीत करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक पुरावे सी.डी.आर, डी. व्ही. आर यांचा आधार नाही.<br>६) मा. न्यायालयात साक्षिदरम्यान आरोपीच्या ताब्यातुन जप्त केलेली काडतुसे ओळखण्यास पंच साक्षिदार अयशस्वी ठरले. (पंच सांक्षीदार फितुर)<br>७ ) आरोपी क्र १ ते ३ यांचे ताब्यातुन प्राणघातक शस्त्रे व इतर साहित्य जप्त केल्याचे सिध्द करता आले नाही.<br>८) पंच साक्षिदार हे सराईत होते तसेच पुराव्यात तफावत आढळली.<br>९) सहाय्यक तपासी अधिकारी यांचा पुरावा विश्वासार्ह नसल्यामुळे नाकारला.<br>१०) आरोपी क्र ४ कडून जप्त केलेल्या वाहन क्र एम.एच ०४ ए व्हाय २१०८ ची मालकी फिर्यादीव्दारे सिध्द झालेली नाही.<br>११) आरोपी मधिल परस्पर संबंध असलेला कोणताही विश्वसनीय पुरावा रेकॉर्डवर आणला गेला नाही.<br>१२)सी.डी.आर चे संगणकातुन पत्र मिळविण्यात आल्याबाबतचे सादर केलेले ६५ ब प्रमाणपत्रात तफावत आढळली.<br>१३) जप्ती पंचनामा अंतर्गत जप्त केलेले नमुने CFSL कडे पाठवताना योग्य प्रक्रीया पाळली गेली नाही.<br>१६) पोलीस उप आयुक्त यांनी पारित केलेले प्रतिबंधात्मक आदेश सिध्द करता आले नाही.<br>१७) आरोपी क्र. ८ चा कबुली जबाबामध्ये त्रुटी आढळल्या. | | | |

( पुजा ढोक )
विधी अधिकारी
गुन्हे शाखा, मुंबई.

( मिलिंद काठे )
पोलीस निरीक्षक,
गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक,
गुन्हे शाखा, मुंबई.

( राज तिलक रौशन)
पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१),
अति. कार्यभार पो.उ.आ. (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, मुंबई.

Scanned with CamScanner